जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७३८ दिनांक - ०१/११/२०२२**

## कोथरुड पोलीस ठाणे, पुणे शहर

## कोथरुड पोलीस स्टेशनकडुन संघटित गुन्हेगारी करुन दहशत निर्माण करणारा आरोपी नामे सागर ऊर्फ मांडी येनपुरे व त्याचे इतर ०४ साथीदार यांचे गुन्हेगारी टोळीवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ अंतर्गत कारवाई

कोथरुड पोलीस स्टेशनकडील रेकार्डवरील गुन्हेगार **१)सागर ऊर्फ मांडी तानाजी येनपुरे,वय-२९,रा.आदर्श चौक,केळेवाडी,कोथरूड पुणे (टोळी प्रमुख) व त्याचे टोळी मधील इतर सदस्य तथा कोथरुड पोलीस ठाणे रेकॉर्डवरील गुन्हेगार २)साहिल विनायक जगताप,वय-२५,रा.आदर्श चौक, केळेवाडी,कोथरूड,पुणे ३)साहिल रविंद्र कंधारे,वय-२२,रा.लेन नं.३,हनुमाननगर,केळेवाडी,पुणे ४)वैभव ऊर्फ भो-या प्रदिप जगताप,वय-२२,रा.राऊतवाडी,केळेवाडी,कोथरूड,पुणे ५)जितेश उर्फ पिल्या संतोष खेडेकर,वय-२०,रा.केळेवाडी,कोथरूड,पुणे** यांचेवर कोथरुड पोलीस ठाणे येथे वैयक्तीकपणे खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, मृत्यु किंवा जबर दुखापत घडवुन आणण्याची धमकी देणे, गैरकायद्याची मंडळी जमवणे, इच्छापुर्वक जबर दुखापत करणे, लोकांची जीवीतास धोका निर्माण करण्याचे उद्देशाने दहशत निर्माण करणे यासारखे गंभीर व हिंसक गुन्हे केलेले आहेत. शरीरा विरुध्दचे व मालाविरुध्दचे गुन्हे दाखल आहेत.

नमुद आरोपी नामे १) सागर ऊर्फ मांडी तानाजी येनपुरे (टोळी प्रमुख) व त्यांचे साथीदारा विरुध्द **कोथरुड पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं.२३९/२०२२ भादंविक ३०७,१४१,१४२,१४४,१४८, १४९,आर्म ॲक्ट ४,(२५)महा.पो.अधि.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५), क्रि.लॉ.क.३ व ७** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वरील नमुद आरोपीतांवर वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करुन सुध्दा ते जुमानत नसल्या मुळे तसेच त्यांच्या वर्तनात काहीही सुधारणा होत नसल्यामुळे कोथरुड पोलीस स्टेशन **गु.र.नं.२३९/२०२२** या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)**(ii),**३(२),३(४) चा अंतर्भाव करणेसाठी सदर कायदयाचे कलम २३(१)(अ) अन्वये मंजुरी मिळणे करीता वरीष्ठ पोलीस निरीक्षक,महेंद्र जगताप,कोथरुड पोलीस ठाणे,पुणे शहर यांनी मा.पोलीस उप आयुक्त,परीमंडळ ०३ पुणे शहर व श्रीमती. पौर्णिमा गायकवाड यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.राजेंद्र डहाळे यांना प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन आरोपी नामे १)सागर ऊर्फ मांडी तानाजी येनपुरे,वय-२९,रा.आदर्श चौक,केळेवाडी,कोथरूड पुणे (टोळी प्रमुख) व त्याचे टोळी मधील इतर सदस्य तथा कोथरुड पोलीस ठाणे रेकॉर्डवरील गुन्हेगार २)साहिल विनायक जगताप,वय-२५,रा.आदर्श चौक, केळेवाडी,कोथरूड,पुणे ३)साहिल रविंद्र कंधारे,वय-२२,रा.लेन नं.३,हनुमाननगर,केळेवाडी,पुणे ४)वैभव ऊर्फ भो-या प्रदिप जगताप, वय-२२,रा.राऊतवाडी,केळेवाडी,कोथरूड,पुणे ५)जितेश उर्फ पिल्या संतोष खेडेकर,वय-२०,रा. केळेवाडी,कोथरूड,पुणे यांचेविरुध्द दाखल असलेल्या कोथरुड पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं. २३९/२०२२,भादंविक ३०७,१४१,१४२,१४४,१४८,१४९,आर्म ॲक्ट ४,(२५)महा.पो.अधि.क. ३७(१)१३५, आर्म ॲक्ट ४(२५),क्रि.लॉ.क.३ व ७ प्रमाणे या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)**(ii),**३(२),३(४) चा अंतर्भाव करणेची मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर श्री. राजेंद्र डहाळे यांनी मंजुरी दिलेली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा.सहायक पोलीस आयुक्त,श्रीमती रुक्मिणी गलांडे कोथरुड विभाग हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री.अमिताभ गुप्ता, मा.पोलीस सह आयुक्त श्री. संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग श्री. राजेंद्र डहाळे, मा. पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-०३,श्रीमती.पौर्णिमा गायकवाड, मा.सहायक पोलीस आयुक्त,कोथरुड विभाग,श्रीमती. रुक्मिणी गलांडे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,कोथरुड पोलीस ठाणे,महेंद्र जगताप, पोलीस निरीक्षक,गुन्हे,बाळासाहेब बडे, पोलीस उपनिरीक्षक,तानाजी पांढरे, पोलीस उप-निरीक्षक,प्रविण कुलकर्णी, पोलीस अंमलदार अजय सावंत व अनिल बारड यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.अमिताभ गुप्ता यांनी पुणे आयुक्तालयाचा कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देऊन शरिराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व समाजामध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून, गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश दिले आहेत. त्यांचे मार्गदर्शनाखाली मोक्का अंतर्गत केलेली **चालु वर्षातील ४२ वी एकुणातील १०५ वी कारवाई आहे.**